(१)

२२

# 'प्रेरणा'

आज मी आपल्याला आपल्यातल्या एका गुणी मैत्रीणी विषयी सांगणार आहे. तिच्या मस्तकी देवी सरस्वतीचा वरदहस्त आहे. अक्षरधन आणि विचारधनाने समृद्ध असलेल्या या मैत्रीणीच्या मनांत एक सुंदर कल्पना जन्माला आली ती म्हणजे "गुलमोहर", गुलमोहराच्या निमित्ताने आपण सतत एकमेकींच्या सहवासात आहोत. तिच्या साध्या आणि सरळ स्वभावाने तिने आपल्या सगळ्यांची मनं जिंकली आहेत. तिच्या आग्रहाने प्रेरीत होऊन आपणही लेखणी हातात धरली आणि विचारांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न केला. या निमित्ताने मी तिला एकच सांगेन

नित्यनवे आकाश फिरावे।<br>
नित्य शोधाव्या नव्या दिशा॥<br>
शब्दांचे शेले नित्य गुंफावे।<br>
रोज जन्मावा नवा विचार॥<br>
विश्व हे सारे ठेंगणे व्हावे।<br>
अशी ऊंच घे भरारी॥<br>
आकाशाला घाल गवसणी।<br>
कवेत घे ही दुनिया सारी॥

नलीनी जोहरे.<br>
वृंदावन हैट<br>
कोथरूड.



56